| | | | |
|---|---|---|---|
| दाखल तारीख | ०४ | ०२ | २०१७ |
| नोंदणी तारीख | ०४ | ०२ | २०१७ |
| निकाल तारीख | ०२ | ०७ | २०२६ |
| कालावधी | **व– ०९** | **म– ०४** | **दि– २८** |

## भाग 'अ'

| | | |
|---|---|---|
| **MHPU180002982017** | **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, (न्यायालय क्र.२), दौंड यांच्या न्यायालयात**<br>(पिठासीन अधिकारी : एस.एन. पाटील यांचे समक्ष) | |
| | **नियमित फौजदारी खटला क्र.२५/२०१७** | **नि.क्र.६८** |
| | **न्यायनिर्णय दिनांक** | **०२–०७–२०२६** |

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी पक्ष** | | संपत दत्तु निगडे,<br>वय – ४७ वर्ष, धंदा – शेती,<br>रा. कानगाव, ता. दौंड, जि. पुणे |
| फिर्यादी पक्षातर्फे | | श्री. पी. डी. सोनवणे |
| | | |
| आरोपींतर्फे | | ॲड श्री. गायकवाड |

## भाग 'ब'

| | | |
|---|---|---|
| घटना तारीख | :– | २५.०६.२०१५ |
| तक्रार दाखल तारीख | :– | ०७.०९.२०१५ |
| फिर्याद दाखल तारीख | :– | ०४.०२.२०१७ |
| दोषारोप निश्चितीची तारीख | :– | २५.०९.२०१८ |
| पुरावा सुरू झालेली तारीख | :– | २५.०९.२०१८ |
| न्यायनिर्णयाकरीता राखीव ठेवलेली तारीख | :– | ०२.०७.२०२६ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयाची तारीख | :– | ०२.०७.२०२६ |
| शिक्षा सुनावण्याकरीता नेमलेली तारीख | :– | –– |

## <u>आरोपींचा तपशील</u>

| अ. क्र. | आरोपींची नावे | अटकेची तारीख | जमानत मिळाल्याची तारीख | ठेवलेले दोषारोपाची गुन्हा कलम | आरोपींची निर्दोष मुक्तता किंवा शिक्षा | सुनावलेली शिक्षा | फौ.प्र.सं. ४२८ च्या अनुषंगाने आरोपींनी संपरीक्षेदरम्यान आरोपी जेलमध्ये असलेले कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | लक्ष्मण संपत निगडे | – | ०४.०३.२०१७ | कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, सह ३४ भा.दं.वि. | **निर्दोष मुक्तता** | – | – |
| २. | ज्योती संपत निगडे | – | ०४.०३.२०१७ | कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, सह ३४ भा.दं.वि. | **निर्दोष मुक्तता** | – | – |

## <u>भाग 'क'</u>

**अ. अभियोग पक्ष साक्षीदार :–**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरूप** |
|---|---|---|
| सा.क्र. १ | संपत दत्तु निगडे | फिर्यादी |
| सा.क्र. २ | हनुमंत बाळासाहेब निगडे | साक्षीदार |

**ब– बचाव पक्ष साक्षीदार :–**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

क– न्यायालयामार्फत साक्षीदार :–

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय निशाणी

अ– अभियोग पक्षाचे निशाणी :

| अ–क्र– | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

ब– बचाव पक्षाचे निशाणी :

| अ–क्र– | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

क– न्यायालयामार्फत निशाणी :

| अ–क्र– | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

ड– मुद्देमाल :

| अ–क्र– | मुद्देमाल क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

## न्यायनिर्णय
## (अधिघोषित दिनांक ०२ जुलै, २०२६)

फिर्यादी संपत दत्तु निगडे यांच्या फिर्यादवरुन आरोपींविरूध्द् भारतीय दंड संहिता, १९६० (यापुढे भा.दं.वि. असे संबोधण्यात येईल) कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६

सह ३४ अन्वये प्रस्तुत खटला दाखल केला आहे.

**खटल्याची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे–**

०२. दिनांक २५.०६.२०१५ रोजी सकाळी ७.३० वाजता फिर्यादी संपत दत्तु निगडे हे त्यांचे मक्याचे बी आरोपी क्र.१ लक्ष्मण संपत निगडे यांच्याकडे परत घेण्यासाठी गेले असता, सदर आरोपीने 'मी मक्याचे बी आणले नाही, मला घरामध्ये व शेतीमध्ये वाटणी करुन दे' असे म्हणुन फिर्यादीची गचुंडे धरली. तसेच लाथाबुक्यांनी मारहाण करुन फिर्यादीच्या डोक्यात दगडाने मारहाण केली. त्यानंतर आरोपी क्र.२ हीने फिर्यादीस शिवीगाळ केली. त्यामुळे फिर्यादीने आराडाओरडा केला असता शेजारी लोक जमा झाले व हनुमंत बाळासाहेब निगडे यांनी फिर्यादीस पाटस आऊटपोस्ट येथे घेवुन गेले. त्यांनतर पोलिसांनी त्यांना यवत येथील सरकारी दवाखान्यात घेवुन जाण्यास सांगितले. फिर्यादी उपचार घेवुन आल्यानंतर पोलिसांनी त्यांची तक्रार नोंदवुन घेतली नसल्यामुळे त्यांनी न्यायालयात सदरचे प्रकरण दाखल केले.

०३. फिर्यादीने दि.०७/०९/२०१५ रोजी फिर्याद दाखल केली असता दि.०३/०२/२०१७ रोजी आदेशिका जारी करण्यात आली. तसेच आरोपी हजर झाल्यानंतर दोषारोपपुर्वीचे फिर्यादीतर्फे दोन साक्षीदारांचे जबाब नोंदविले व आरोपींविरूध्द भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दोषारोप निश्चित केला.

०४. सदर आरोपींविरूध्द निशाणी क्र.५५ प्रमाणे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये भारतीय दंड संहिता अंतर्गत दोषारोप निश्चीत करण्यात आले. आरोपींना त्यांचे विरुध्द लावण्यात आलेले आरोप वाचुन दाखवले असता ते त्यांनी नाकारले व

संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

**०५.** अभिलेखावरील दोन्ही पक्षांच्या पुराव्यावरुन आणि युक्तिवादावरुन प्रस्तुत खटल्याचे निकालाकरीता पुढील मुद्दे माझे समक्ष उपस्थित होतात. त्या मुद्यांबाबतचे निष्कर्ष मुद्यांचे समक्ष, सकारण मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे:–

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| **१.** दि.२५/०६/२०१५ रोजी सकाळी ७.३० वाजता अगर त्या सुमारास मौजे – होळकरवाडी, ता. दौंड, जि. पुणे गावच्या हद्दीत आरोपींच्या राहत्या घरी संगनमत करुन आरोपी क्र.१ ने हातात दगड घेवुन फिर्यादीच्या डोक्यात मारुन फिर्यादीस इच्छापुर्वक दुखापत पोहचवली, ही बाब फिर्यादीने सिध्द केली आहे काय ? | **नकारार्थी...** |
| **२.** उपरोक्त घटनेच्या दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहचवली, ही बाब फिर्यादीने सिध्द केली आहे काय ? | **नकारार्थी...** |
| **३.** उपरोक्त घटनेच्या दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला शिवीगाळ करुन त्यांचा उद्देशपूर्वक अपमान करुन त्यास प्रक्षोभित करुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा, अशा उद्देशाने अपमान केला, ही बाब फिर्यादीने सिध्द केली आहे काय? | **नकारार्थी...** |
| **४.** उपरोक्त घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस दमदाटी करुन फौजदारीपात्र धाकदपटशा केले, ही बाब फिर्यादीने सिध्द केली आहे काय ? | **नकारार्थी...** |
| **५.** आदेश काय ? | **..अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

**०६.** फिर्यादीने आरोपींवरील गुन्हा सिध्द् करण्यासाठी खटल्याच्या पुष्ट्यर्थ एकुण दोन साक्षीदारांना तपासले. साक्षीदार क्र.१ संपत दत्तु निगडे (फिर्यादी) यांना नि.क्र.३८ वर

सदर साक्षीदाराचा उलटतपास नि.क्र.६३ वर नोंदविला. तसेच, साक्षीदार क्र.२ हनुमंत बाळासाहेब निगडे (साक्षीदार) यांना नि.क्र.४२ वर तपासले.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ करीता :</u>**

**०७.** मुद्दा क्र.१ ते ४ हे एकमेकांशी निगडीत असल्याने पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांचे विवेचन एकत्रीत करण्यात येते. फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र.१ यांचे साक्षीत असे आले आहे की, फिर्यादी आरोपींना ओळखत असुन आरोपी क्र.१ ते २ हे फिर्यादीचे अनुक्रमे मुलगा व सुन आहेत. तसेच आरोपी क्र.१ दहावी नापास असुन त्याचे आळंदी येथे शिक्षण झाले आहे. सदर आरोपी क्र.१ चे शिक्षण फिर्यादीने केले असुन फिर्यादी, आरोपी क्र.१ आणि फिर्यादीचा धाकटा मुलगा शरद कानगाव येथे राहतात. सदर घटनेच्या पुर्वी एक महिना अगोदरपासुन आरोपी हे फिर्यादीपासून वेगळे राहत होते. सदरची घटना दि.२५/०६/२०१५ रोजी घडली असुन घटनेपुर्वी फिर्यादीच्या धाकट्या मुलाचे दोन महिन्यापुर्वी लग्न झाले होते. सदर घटनेच्या दोन महिन्यापुर्वी आरोपी वेगळे राहण्यासाठी वाद करुन घरातुन धान्य, मक्याचे बी, किटक नाशके सोबत घेवुन गेले. साक्षीदाराने पुढे कथन केले की, दि.२५/०६/२०१५ रोजी फिर्यादी हे आरोपी क्र.१ व २ कडे मक्याचे बी, किटकनाशके आणण्यासाठी गेले असता आरोपी क्र.१ ने फिर्यादीस ''मी मक्याचे बी आणले नाही, शेतजमिन व घर वाटुन पाहिजे'' असे म्हणाला. तसेच आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करुन फिर्यादीस ढकलुन देवुन दगडाने मारहाण केल्यामुळे फिर्यादीच्या डोक्यातुन रक्तस्त्राव होवुन त्यांचा शर्ट रक्ताने भिजला.

**०८.** सदर भांडणाचा आवाज ऐकुन आजुबाजुचे लोक जमा झाले व उत्तम फडके यांनी भांडण सोडवुन हनुमंत निगडे यांनी फिर्यादीस पोलिस स्टेशन, पाटस येथे घेवुन गेले. त्यानंतर पाटस पोलिसांनी फिर्यादीस यवत येथील सरकारी दवाखान्यात उपचाराकरीता

पाठविले असता तेथील डॉक्टरांनी मोठी कोच पडल्यामुळे पुढील उपचाराकरीता ससुण हॉस्पीटल, पुणे येथे जाण्यास सांगितले. त्यानुसार फिर्यादी ससुण हॉस्पीटल, पुणे येथे दोन दिवस उपचार घेवुन पाटस आऊट पोस्ट येथे गेले असता, तेथील पोलिसांनी फिर्यादीस उडवाउडवीची उत्तरे दिल्यामुळे सदरची केस दाखल केल्याचे नमुद केले.

०९. सदर साक्षीदाराचा आरोपींच्या वकीलांनी उलटतपास घेतला असता दि.३०.०१.२०१७ रोजी त्यांच्या पत्नीला नांदण्यास येण्यासाठी त्यांनी नोटीस पाठविली होती व सदर नोटीसीस त्यांच्या पत्नीने उत्तर दिले नव्हते. सदर साक्षीदाराने मान्य केले की, आरोपीने त्याचे वडीलोपार्जित जमिन वाटुन मिळण्याची मागणी केली होती परंतु, जमिनीचे वाटप करुन देत नसल्यामुळे आरोपीने न्यायालयात दिवाणी दावा दाखल केला आहे. साक्षीदाराने मान्य केले की, त्यांच्या घरापासुन होळकरवाडीकडे जाण्यासाठी कॅनॉलचा कच्चा रस्ता असुन घटने दिवशी ते आरोपींकडे मोटारसायकलवर गेले होते. तसेच सदरची लेखी तक्रार न्यायालयात दाखल केली नसुन पोलिस स्टेशनला जाण्यासाठी डॉ. दिवेकर यांच्या खाजगी दवाखान्यात गेले होते. साक्षीदाराने मान्य केले की, डॉक्टरांनी तपासुन तसे प्रमाणपत्र दिले असता, सदरचे प्रमाणपत्र पोलिस स्टेशनला जमा केले. या व्यतिरीक्त विचारलेल्या इतर सुचक प्रश्नांना साक्षीदाराने नकारात्मक उत्तरे दिली.

१०. फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.२ यांचे साक्षीत असे आले आहे की, ते एम.आय.डी.सी. कुरकुंभ येथे ७ ते ८ वर्षापासुन काम करीत असुन त्यांची ३ शिफ्टमध्ये नोकरी असते. दि.२५/०६/२०१५ रोजी सकाळी ७.०० वा. त्यांचे घरातुन नोकरीला जाण्यासाठी बाहेर पडले असता, त्यांचा चुलता फिर्यादी संपत निगडे येत होता व त्याच्या डोक्यातुन मार लागल्यामुळे रक्त येत होते. त्यांनी फिर्यादीस गाडीवर घेवुन पाटस पोलीस

स्टेशनला नेले असता पोलिसांनी फिर्यादीस दवाखान्यात जाण्यास सांगितल्यामुळे पाटस येथील दिवेकर हॉस्पीटल येथे दाखल केले. त्यानंतर त्यांना कामावर जाण्यास वेळ झाल्यामुळे ते दुस–या दिवशी कामासाठी निघुन गेले. सदर साक्षीदाराचा आरोपीच्या वकीलांनी उलटतपास राखुन ठेवला होता. परंतू सदर साक्षीदार हा ऊलटतपासाकरीता वारंवार बोलावून देखील हजर झाला नाही.

११. कोणत्याही खटल्यात आरोपींविरूद्ध गुन्हा सिद्ध होणेसाठी फिर्यादीची, जखमीची, पंचाची साक्ष अत्यंत महत्वाची असते. सदर प्रकरणात आरोपीने फिर्यादीस दगडाने मारहाण केल्याबाबत नमुद करण्यात आले. प्रकरणात केवळ एकच साक्षीदार असल्याने त्याची विश्वासहार्य तपासणे आवश्यक आहे. सदरच सा.क्र.१ याने फिर्याद नि.क्र.१ मध्ये त्यांच्यामध्ये व आरोपींमध्ये झालेले भांडण उत्तम फडके व हनुमंत निगडे यांनी सोडविल्याचे नमुद केले. परंतू, पडताळणीवेळी सदर भांडण हनुमंत याने सोडविण्याचे नमुद केले. तसेच, सरतपासात उत्तम फडके याने भांडण सोडविण्याचे नमुद केले. याउलट सा.क्र.२ चे साक्षीत असे आले आहे की, तो घटनेदिवशी सकाळी कामावर जात असताना त्याला वाटेमध्ये सदर फिर्यादी भेटला. एकंदरीत घटनेवेळी सा.क्र.२ हनुमंत निगडे हजर होता किंवा कसे याबाबत फिर्यादीने दिलेल्या तीनही जबाबांमध्ये विसंगती दिसून येते.

१२. फिर्यादीच्या साक्षीनुसार त्याने डॉ.दिवकर तसेच, सरकारी दवाखाना व आउटपोस्ट पाटस येथे गेल्याचे व त्याठिकाणी कारवाई झल्याची बाब नमुद केली आहे. परंतू, त्या अनुषंगाने कोणताही साक्षीदार अभिलेखावर तपासला नाही अथवा तसे वैद्यकीय दस्तऐवज पुराव्याअंति शाबीत केले नाहीत. आरोपीच्या बचावाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये जमीनीच्या वाटपाच्या कारणावरून वाद होता. फिर्यादी हा

त्याचे फिर्याद तसेच, जबाबामध्ये विसंगत विधाने करतो. तसेच, नमूद केलेल्या जबाबाच्या अनुषंगाने कोणताही कागदोपत्री पुरावा फिर्यादीने अभिलेखावर शाबीत केला नाही. फिर्यादी व आरोपी यांच्यात जमीनीच्या वाटपाच्या कारणावरून वाद असल्याची व त्या अनुषंगाने न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्याची बाब फिर्यादीने कबुल केल्याने व फिर्यादीच्या जबाबातील विसंगतीमुळे सदरच्या फिर्यादीची साक्ष विश्वासाहार्य वाटत नाही.

**१३.** सदर प्रकरणात फिर्यादी व्यतिरीक्त इतर कोणताही त्रयस्त साक्षीदार फिर्यादीने तपासला नाही. त्यामुळे फिर्यादीचे फिर्यादवर साशंकता निर्माण होते व आरोपीचा बचाव संभवनिय आहे.

**१४.** प्रस्तुत प्रकरणात आरोपींना दोषी ठरविण्यासाठी आरोपींनी फिर्यादीस प्राणघातक दगडाने इच्छापूर्वक दुखापत पोहचविल्याचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अभियोग पक्षातर्फे आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करुन फिर्यादीचा उद्देशपूर्वक अपमान केला. तसेच फिर्यादीस प्रक्षोभित करुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा, अशा उद्देशाने अपमान केला या अनुषंगाने कोणताही पुरावा खटल्याच्या अभिलेखावर आलेला नाही, म्हणुन मुद्दा क्रमांक १ ते ४ चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ५ करीता:</u>**

**१५.** मुद्दा क्र.१ ते ४ च्या नकारार्थी निष्कर्षावरुन आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. त्याचप्रमाणे या खटल्याचे अपील झाल्यास आरोपींची उपस्थिती मा. वरिष्ठ न्यायालयात राखण्याकरीता त्यांचेकडुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे

जामिन बंधपत्र घेणे योग्य होईल. करीता, मुद्दा क्र.५ च्या उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## :: आदेश ::

**१.** आरोपी क्र.१ लक्ष्मण संपत निगडे, आणि आरोपी क्र.२ ज्योती लक्ष्मण निगडे यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ भा.दं.वि. या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

**२.** आरोपींचे जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

**३.** आरोपींना असेही निर्देश देण्यात येते की, त्यांनी फौ. प्र. सं. कलम ४३७ (अ) पुर्ततेचे कामी सहा महिन्याच्या कालावधीकरिता त्यांचे प्रत्येकी वैयक्तिक बंधपत्र रूपये १५,०००/– सादर करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2026.07.02 17:08:31 +0530

दौंड.
दिनांकः ०२/०७/२०२६

**(एस.एन. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
फौजदारी न्यायालय क्र.२, दौंड

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word for word as per original judgment"

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Vaibhav D. Padman |
| Court name | : | Hon'ble Shri. S.N. Patil<br>J.M.F.C., Court No.2, Daund |
| Date of order | : | 02.07.2026 |
| Order signed by<br>Presiding Officer on | : | 02.07.2026 |
| uploaded on | : | 02.07.2026 |